महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

तात्काळ

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०२२/ 963
दिनांक : 24 MAR 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
**औरंगाबाद विभाग**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करण्याच्या कार्यवाहीबाबत.**

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१७ /प्र. क्र. ३३२/तांशि-४ दि. ०७/१०/२०१७
२. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/४५६ दि. १७/११/२०२१
३. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/४८९ दि. २०/१२ /२०२१
४. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/०५ दि. ०५/०१ /२०२२
५. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/१८ दि. ०३/०२ /२०२२
६. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/४६ दि. ०८/०३ /२०२२
७. मा. संचालक तं.शि.सं., म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप /२०२१-२२/४८ दि. १४/०३ /२०२२

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय , मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांकारीता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात. ( संकेतस्थळ : www.mahadbtmahait.gov.in )

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

उपरोक्त संदर्भीय २ ते ७ च्या पत्रान्वये, महाडीबीटी पोर्टलवरील विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जांच्या तपासणीबाबत या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात आले आहे. तरी,

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ करीता महाडीबीटी पोर्टल वर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणा-या **१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** या योजनांबाबत या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की,

१. महाडीबीटी पोर्टलवर संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त दोन्ही योजनांचे विद्यार्थ्यांनी पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले व संस्थास्तरावर ( Clerk व Principal Login मध्ये ) प्राप्त होत असलेले अर्ज छाननी करताना सदर विद्यार्थी हा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे ( CAP- Centralize Admission Process ) प्रवेशित आहे की नाही याची विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत Upload केलेल्या संस्थेकडून देण्यात आलेल्या CAP Allotment Letter (Receipts -cum-Acknowledgement of admission confirmation) / CAP ID certificate आधारे खात्री करण्यात येत होती.

२. तरी याबाबत असे कळविण्यात येते की, सन २०२१-२२ पासून महाडीबीटी पोर्टलवर **संस्थेच्या** लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त दोन्ही योजनांचे विद्यार्थ्यांनी पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले व संस्थास्तरावर ( Clerk व Principal Login मध्ये ) प्राप्त होत असलेले अर्ज छाननी ( मंजूर / नामंजूर ) करताना सदर **विद्यार्थी** हा **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेशित झालेला आहे किंवा कसे** याची **तपासणी वरील अनुक्रमांक १ नुसार व आपल्याकडे उपलब्ध असलेल्या संस्थानिहाय मंजूर गुणवत्ता यादीतून करून** संदर्भ क्र. १ च्या शासननिर्णयातील ( पान क्र. ८) क्र. ४ नुसार "उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणा-या उपकेंद्रामधील ( खासगी अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यताप्राप्त व त्या विद्यापीठांतर्गत येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत **"केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे** ( व्यवस्थापन कोट्यातील / संस्थास्तरावरील प्रवेश वगळून ) **प्रवेशित" असलेल्या विद्यार्थ्यांचेच** अर्ज योजनेच्या शासन निर्णयातील पात्रतेच्या इतर अटी व शर्तीनुसार तपासून मंजूर करावे.

**कोणत्याही परिस्थितीत संस्था स्तरावरील प्रवेश** (Institute Level Admission / Admission Against CAP), **व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश** ( Management Quota Admission) **घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात येऊ नयेत. असे अर्ज संस्थास्तरावरच नामंजूर / रद्द** ( Reject ) **करण्यात यावेत.**

३. जर संस्थेकडून Clerk व Principal Login मधून वरील अनुक्रमांक २ मध्ये नमूद बाबींची पूर्तता न करणारे अर्ज मंजूरीसाठी पुढील डेस्कला ( Department Level ) पाठविण्यात आल्यास असे अर्ज **नामंजूर / रद्द ( Reject )** करुन अशा संस्थांवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

४. अपात्र विद्यार्थ्याला योजनेचा लाभ दिला गेल्यास याबाबतची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( उमेश नागदेवे )
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद .

प्रत : मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.